दयानंद कला महाविद्यालय, लातूर
मराठी विभाग
बी.ए. तृतीय वर्ष
सत्र - पाचवे
“विविध स्पर्धा परीक्षा आणि मराठी व्याकरण”
(HMARET - 1301)

प्रा.अं. श्री. भुरे

<u>विविध स्पर्धा परीक्षा आणि मराठी व्याकरण</u>

◆ पूर्वज्ञान :

१) विध्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेची ओळख आहे.

२) विद्यार्थ्यांना व्याकरणाची जाण आहे.

◆ उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेच्या स्वरूपाचा परिचय करून देणे.

२) स्पर्धा परीक्षेत मराठी व्याकरणाचे असलेले महत्त्व अधोरेखित करणे.

३) मराठी व्याकरण संकल्पना आणि स्वरूपाचा परिचय करून देणे.

४) विद्यार्थ्यांना विविध व्याकरणीक घटकांचा सूक्ष्म परिचय करून देणे.

५) विद्यार्थ्यांत स्पर्धा परीक्षा आणि मराठी व्याकरणाची आवड निर्माण

करणे.

◆ फलसृती :

१) विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या स्वरूपाचा परिचय होईल.
२) विद्यार्थ्यांना व्याकरण संकल्पना आणि स्वरूप समजेल.
३) विविध स्पर्धा परीक्षेत मराठी व्याकरणाचे महत्त्व लक्षात येईल.
४) व्याकरणाच्या विविध घटकांचा विद्यार्थ्यांना सूक्ष्म परिचय होईल.
५) विद्यार्थ्यात स्पर्धा परीक्षा आणि मराठी व्याकरणाची आवड निर्माण
होईल.

◆ अनुक्रमणिका :

१) संधीविचार :
संधी संकल्पना, संधीचे प्रकार.
२) लिंगविचार :
लिंग संकल्पना, वर्गीकरण, प्रकार
३) वाक्यविचार :
वाक्याचे स्वरूप, प्रकार,
अर्थानुसार वाक्याचे प्रकार,
रचनेनुसार वाक्याचे प्रकार.
४) वचनविचार :
वचन संकल्पना, स्वरूप, प्रकार
५) अलंकार :
अलंकाराचे स्वरूप, प्रकार,
शब्दालंकार - अनुप्रास, यमक व श्लेष
अर्थालंकार - उपमा, उत्प्रेक्षा, व दृष्टांत

◆◆◆

◆ प्रस्तावना :

भाषा हे मानवी संवादाचे व अभिव्यक्तीचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे भाषेमुळे मानवी विकास साध्य होतो. मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या प्रशासकीय, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाची भाषा आहे. आजची युग हे स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रात घेतल्या जाणाऱ्या अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी भाषेचे आणि विशेषतः मराठी व्याकरणाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. योग्य शब्दलेखन, शुद्ध वाक्यरचना, शब्दसंपत्ती, विरामचिन्हे, संधी, समास, अलंकार, वाक्प्रचार, म्हणी आणि आकलनक्षमता या घटकांचे ज्ञान स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी उपयुक्त ठरते.

मराठी व्याकरणाचे ज्ञान केवळ प्रश्नांची उत्तरे देण्यासाठीच नव्हे, तर लेखी परीक्षा, निबंधलेखन, कार्यालयीन पत्रव्यवहार आणि मुलाखतीमध्ये प्रभावीपणे विचार मांडण्यासाठीही आवश्यक आहे.

◆ विविध स्पर्धा परीक्षा व मराठी व्याकरण :

महाराष्ट्र लोकसेवा आयोग **(MPSC)**, राज्यसेवा परीक्षा, संयुक्त गट-ब परीक्षा **- PSI, STI, ASO**, संयुक्त गट-क परीक्षा, तलाठी,लिपिक, शिक्षक भरती परीक्षा व इतर पदनिहाय भरती परीक्षा या परीक्षांमध्ये संबंधित अभ्यासक्रमानुसार मराठी भाषा, व्याकरण, शब्दसंपत्ती आणि आकलन यांचे महत्त्व असते.

वरील विविध स्पर्धा परीक्षेत मराठी भाषेचे व्याकरण विचारले जाते. ज्यामध्ये वर्णमाला व उच्चार, संधी व संधीचे प्रकार,

समास व समासाचे प्रकार, शब्दांच्या जाती, नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद लिंग व वचनविचार, विभक्ती व कारक, काळ व प्रयोग, वाक्य व वाक्यांचे प्रकार, वाक्यशुद्धी व शब्दशुद्धी, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, म्हणी व वाक्प्रचार, शब्दसमूहाबद्दल एक शब्द, अलंकार व विरामचिन्हे, उताऱ्यावरील आकलन व शब्दसंपत्ती. अशा विविध प्रकारच्या व्याकरण घटकांचा समावेश होतो.

◆ स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी व्याकरणाचे महत्त्व :

व्याकरणामुळे भाषेमध्ये अचूकता निर्माण होते व्याकरण हे भाषेला एका नियमांमध्ये ठेवून प्रमाणभाषा महत्त्वपूर्ण ठरते मराठी व्याकरणामुळे भाषेचे शुद्ध ज्ञान प्राप्त होते, मराठी भाषेचा योग्य वापर करता येतो, गुणवाढीस मदत होते, व्याकरणावर आधारित प्रश्नांची अचूक उत्तरे देता येतात, शब्दसंपत्ती वाढण्यास मदत होते, समानार्थी, विरुद्धार्थी शब्द आणि वाक्प्रचारांचे ज्ञान वाढते, शुद्धलेखनात सुधारणा होऊन शब्दलेखनातील चुका कमी होतात, वाक्यरचना समजते, योग्य आणि अयोग्य वाक्यांमधील फरक ओळखता येतो, वेळेची बचत होते, नियम समजल्यामुळे वस्तुनिष्ठ प्रश्न जलद सोडवता येतात, आकलनक्षमता वाढते, उतारे वाचून त्यांचा अर्थ अचूक समजतो, अचूक पर्याय निवडन्यासाठी मदत होते, बहुपर्यायी प्रश्न सोडविणे सोपे होते, लेखनकौशल्य विकसित होते, निबंध, पत्र आणि इतर लेखन अधिक प्रभावी होऊन लेखन कौशल्य विकास होतो, प्रशासकीय कामात उपयोग होतो, कार्यालयीन पत्रव्यवहार आणि अहवाललेखनासाठी मदत होते, मुलाखतीत उपयोग होतो, विचार स्पष्टपणे मांडण्याची क्षमता विकसित होते, भाषिक आत्मविश्वास वाढण्यास मदत होते, मराठी भाषेचा वापर करताना आत्मविश्वास निर्माण होऊन, अभ्यासाचा पाया मजबूत होतो, भाषाविषयक इतर घटक समजण्यास मदत होते, पुनरावृत्ती सुलभ

होते, नियम आणि उदाहरणे लक्षात ठेवल्याने परीक्षेपूर्वी उजळणी करता येते, यशाची शक्यता वाढीस लागते, संबंधित परीक्षेच्या अभ्यासक्रमात व्याकरण असल्यास त्यातील चांगली तयारी एकूण कामगिरी सुधारण्यास मदत करते.

प्रकरण : पहिले

—----------

◆ संधीविचार :

संकल्पना, स्वरूप, महत्त्व आणि प्रकार :

मराठी व्याकरणामध्ये संधी हा एक महत्त्वाचा घटक आहे. भाषेतील दोन वर्ण किंवा दोन शब्द एकमेकांच्या जवळ आल्यावर त्यांच्या उच्चारांत बदल होऊन नवीन वर्णरूप तयार होते, या प्रक्रियेला संधी असे म्हणतात. संधीमुळे भाषेतील शब्दांचे उच्चार सुलभ होतात आणि भाषेला प्रवाहीपणा प्राप्त होतो.

● संधी म्हणजे काय?

'संधी' या शब्दाचा सामान्य अर्थ जोडणे, सांधने, एकत्र येणे किंवा संयोग होणे असा होतो. व्याकरणाच्या दृष्टीने दोन वर्णांच्या संयोगातून होणाऱ्या ध्वनीबदलाला संधी असे म्हणतात.

उदा. -

१. देव + आलय = देवालय (व + आ = वा) येथे पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण एकत्र येऊन त्याबद्दल एकच वर्ण तयार होतो. वर्णांच्या अशा एकत्रीकरणास 'संधी' असे म्हणतात. (संधी = वर्ण + वर्ण)

२.विद्या + आलय = विद्यालय, ३. सूर्य + उदय = सूर्योदय,

४. महा + ईश = महेश

वरील उदाहरणांमध्ये दोन वर्ण किंवा शब्द एकत्र येताना त्यांच्या रूपात बदल झालेला दिसतो. या बदलाच्या प्रक्रियेला संधी असे म्हणतात.

● संधीच्या व्याख्या :

१. दोन वर्ण जवळ आल्यामुळे त्यांच्या उच्चारांत किंवा रूपांत जो बदल होतो, त्याला संधी म्हणतात.
२. दोन वर्णांच्या संयोगाने होणाऱ्या ध्वनीविकाराला किंवा वर्णबदलाला संधी असे म्हणतात.
३. भाषेच्या प्रवाही उच्चारासाठी जवळजवळ येणाऱ्या वर्णांमध्ये घडून येणाऱ्या ध्वनिपरिवर्तनाच्या प्रक्रियेला संधी म्हणतात.

◆ संधीचे स्वरूप :

१. संधीमध्ये दोन वर्ण एकमेकांच्या जवळ येतात आणि त्यांचा संयोग होतो.
२. संधीमध्ये ध्वनीबदल होतो.
३. संधीमुळे शब्दांचा उच्चार अधिक सहज आणि प्रवाही होण्यास मदत होते.
४. दोन शब्द किंवा शब्दघटक एकत्र आल्यामुळे नवीन संयुक्त शब्द तयार होतात.
५. संधीमुळे बोलताना शब्दांचा परस्परांशी असलेला संबंध सहजपणे व्यक्त करता येतो.
५. संधीचा संबंध भाषेतील ध्वनी, उच्चार आणि वर्णांच्या परस्पर परिणामांशी असतो.
७. संधीमुळे केवळ उच्चारातच नव्हे, तर शब्दाच्या लेखी रूपातही बदल दिसून येतो.
८. संधीचे बदल भाषेतील विशिष्ट व्याकरणिक नियमांनुसार घडतात.

९. संस्कृत, मराठी आणि इतर भारतीय भाषांच्या परंपरेनुसार संधीचे नियम व त्यांचा वापर वेगवेगळ्या प्रकारे आढळतो.
१०. संधी झालेल्या शब्दाचे मूळ घटक वेगळे करून दाखविण्याच्या प्रक्रियेला संधिविग्रह म्हणतात.

◆ संधीचे महत्त्व :

संधीचे महत्त्व व्याकरणामध्ये अधिक महत्वपूर्ण आहे. जसे की, शुद्धलेखनासाठी उपयुक्त, शुद्ध उच्चारासाठी मदत होते, शब्दरचना समजते, व्याकरणाचे ज्ञान वाढते, भाषेतील सौंदर्य वाढते, वाचनक्षमता सुधारते, लेखनकौशल्य विकसित होते, साहित्याच्या अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ठरते, संधिविग्रह करता येतो, भाषिक विश्लेषणास मदत :होते, शब्दांमध्ये घडणारे ध्वनीबदल ओळखता येतात, संस्कृत-मराठी संबंध समजतात, शब्दसंग्रह वाढतो, स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ठरते, अर्थबोध सुलभ होतो, भाषेच्या शास्त्रीय अभ्यासाला आधार मिळतो. एकूणच संधीमुळे भाषेचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मदत होते.

◆ संधीचे प्रकार :

संधीचे मुख्यतः तीन प्रकार पडतात.
१. स्वर संधी : (स्वर संधी = स्वर + स्वर)

दोन स्वर एकमेकांच्या जवळ आल्यामुळे त्यांच्या संयोगातून जो वर्णबदल होतो, त्याला स्वर संधी म्हणतात.

◆ स्वर संधी पुढील पाच नियमाच्या आधारे पाहता येते -

नियम - १. दीर्घत्व संधी :

दोन सजातीय स्वर लागोपाठ आल्यास त्या दोन्हीबद्दल एकच दीर्घ स्वर तयार होऊन संधी होते.

उदा. -
१. भीम + अर्जुन = भिमार्जुन (अ + अ = आ)
२. काव्य + अमृत = काव्यामृत
३. देव + आलय = देवालय
४. विद्या + आलय = विद्यालय
५. रवी + इंद्र = रवींद्र.

नियम - २. गुणादेश संधी :

अ/आ या स्वरांपुढे इ/ई आल्यास त्या बद्दल ए तयार होतो. उ/ऊ आल्यास ओ व ऋ आल्यास अर् होऊन संधी होते.
उदा. -
१) ईश्वर + इच्छा = ईश्वरेच्छा (अ +इ = ए)
२) गज + इंद्र = गजेंद्र
३) लोक + उत्सव = लोकोत्सव
४) देव + ऋषी = देवर्षी
५) चंद्र + उदय = चंद्रोदय.

नियम - ३. वृदध्यादेश संधी :

अ/आ या स्वरांपुढे ए/ऐ हे स्वर आल्यास त्या दोघांबद्दल ऐ तयार होतो व ओ/औ आल्यास त्याबद्दल औ तयार होऊन संधी होते.
उदा. -
१) एक + एक = एकैक (अ + ए = ऐ)
२) मत + ऐक्य = मतैक्य
३) प्रजा + ऐक्य = प्रजैक्य
४) गंगा + ओघ = गंगौघ
५) वन + औषधी = वनौषधी.

नियम - ४. यणादेश संधी :

इ / उ / ऋ यांच्यापुढे विजातीय स्वर आल्यास इ / ई बद्दल य, उ / ऊ बद्दल व आणि ऋ बद्दल र हे वर्ण तयार होतात.

उदा. -

१) प्रीती + अर्थ = प्रीत्यर्थ (इ + अ = य + अ = य)

२) इति आदि इत्यादी

३) अभि आस अभ्यास

४) प्रति एक प्रत्येक

५) पितृ आज्ञा पित्राज्ञा.

नियम - ५.

ए, ऐ, ओ, औ, या स्वरांपुढे कोणताही स्वर आला तर त्याबद्दल अनुक्रमे अय, आय, अव, आव असे आदेश होतात व पुढील स्वर त्यात मिसळून संधी होते.

उदा. -

१) ने + अन = नयन (ए + अ = अय + अ = अय)

२) गै + अन = गायन

३) गो + आनन = गवानन

४) गो + इच्छा = गविच्छा

५) नौ + इक + नाविक.

२. व्यंजन संधी : (व्यंजन संधी = व्यंजन + व्यंजन/स्वर)

दोन वर्णांच्या संयोगात व्यंजनाच्या रूपात बदल होतो, तेव्हा त्याला व्यंजन संधी म्हणतात. काही वेळा व्यंजनाचा पुढील वर्णावर किंवा पुढील वर्णाचा आधीच्या व्यंजनावर परिणाम होतो.

व्यंजन संधीचा अभ्यास करताना नियम क्र.१ प्रथम व्यंजन संधी, नियम क्र.२ तृतीय व्यंजन संधी, नियम क्र. ३ अनुनासिक संधी,

नियम क्र. ४ त चा नियम, नियम क्र. ५ म चा नियम, नियम क्र. ६ छ चा नियम. अशा पद्धतीने करता येईल
उदा. -
१) वाक + प्रचार = वाक्प्रचार (क + प्र = क + प्र = क्प्र)
२) दिक + विजय = दिग्विजय
३) महत + अंबा = महादंबा
४) सत +मार्ग = सन्मार्ग
५) सत + जन = सज्जन
६) सम + अर्पण = समर्पण.

३ विसर्ग संधी : (विसर्गसंधी = विसर्ग + व्यंजन / स्वर)

विसर्ग (ः) हा एक विशेष ध्वनीचिन्ह आहे. विसर्गाच्या पुढे स्वर किंवा व्यंजन आल्यामुळे विसर्गात किंवा संबंधित वर्णात बदल होतो, त्याला विसर्ग संधी म्हणतात.
विसर्गसंधीचा विचार पुढील नियमाने करता येईल.
नियम - १. विसर्ग - उकार - संधी

विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा उ होतो व तो मागील अ मध्ये मिसळून त्याचा ओ होतो. यालाच विसर्ग- उकार- संधी असे म्हणतात.
उदा. -
१) मनः + रथ = मनोरथ (मन + अ + उ + रथ)
२) अध: + वदन = अधोवदन
३) तप: + बल = तपोबल.

नियम - २. विसर्ग - र- संधी.

विसर्गाच्या मागे अ, आ, शिवाय कोणताही स्वर असून पुढे मृदू वर्ण आल्यास विसर्गाचा र होऊन संधी होते. यालाच विसर्ग- र - संधी म्हणतात.

उदा. -

१) नि: + अंतर = निरंतर

२) बहि: + अंग = बहिरंग

३) आशी: + वाद = आशीर्वाद

नियम - ३. विसर्ग - कायम / लोक - संधी.

विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे क, ख, प,फ यापैकी एखादे व्यंजन आले, तर विसर्ग कायम राहतो. मात्र पुढे स्वर आला तर विसर्ग लोक पाहतो.

उदा. -

१) प्रातः + काल = प्रातःकाल

२) मनः + पूर्वक = मनःपूर्वक

नियम - ४.विसर्ग - ष -संधी.

विसर्गाच्या मागे इ किंवा उ असून पुढे क,ख, प,फ यापैकी कोणताही वर्ण असल्यास विसर्गाचा ष होतो.

उदा. -

१) नि: + पाप = निष्पाप

२) नि: + फळ = निष्फळ

३) नि: + कर्ष = निष्कर्ष.

नियम - ५. विसर्ग - स श - संधी.

विसर्गाच्या पुढे च, छ आल्यास विसर्गाचा श होतो त थ आल्यास स होतो.

उदा. -

१) मन: + ताप = मनस्ताप
२) नि: + चय = निश्चय
३) तप: + चर्या = तपश्चर्या.

सारांश :

संधी ही मराठी व्याकरणातील वर्णरचनेशी संबंधित महत्त्वाची प्रक्रिया आहे. दोन वर्ण किंवा शब्दघटक एकत्र आल्यामुळे होणारे ध्वनी व रूपबदल संधीच्या अभ्यासातून स्पष्ट होतात. स्वर संधी, व्यंजन संधी आणि विसर्ग संधी हे तिचे प्रमुख पारंपरिक प्रकार आहेत. संधीच्या अभ्यासामुळे शुद्धलेखन, उच्चार, शब्दरचना, संधिविग्रह आणि भाषिक विश्लेषण यांचे ज्ञान विकसित होते. त्यामुळे मराठी भाषा प्रभावीपणे समजून घेण्यासाठी आणि तिचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी संधीचे ज्ञान आवश्यक आहे.

प्रकरण : दुसरे

—----------

◆ लिंगविचार :

संकल्पना, स्वरूप, महत्त्व आणि प्रकार.

मराठी व्याकरणामध्ये लिंगविचार हा नामाशी संबंधित एक महत्त्वाचा घटक आहे. नामातून व्यक्त होणाऱ्या व्यक्ती, प्राणी, वस्तू किंवा भाव यांच्या लिंगाचे व्याकरणाच्या दृष्टीने वर्गीकरण केले जाते. या वर्गीकरणाचा अभ्यास म्हणजे लिंगविचार होय. व्याकरणात लिंग ही संकल्पना केवळ स्त्री किंवा पुरुष या नैसर्गिक भेदांपुरती मर्यादित नसून निर्जीव वस्तू, पदार्थ आणि अमूर्त संकल्पना यांनाही भाषेच्या व्याकरणिक नियमानुसार लिंग असते.

◆ लिंग संकल्पना :

मराठी व्याकरणात लिंगविचार ही संकल्पना खूप महत्त्वाची असून लिंग म्हणजे लक्षण किंवा चिन्ह होय.

नामाच्या रुपावरून एखादी वस्तू वास्तविक अथवा काल्पनिक पुरुषजातीची की स्त्रीजातीची आहे, की दोन्ही जातीची नाही, हे ज्यावरून आपल्याला समजते त्यास लिंग म्हणतात.

नामाचे पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग असे वर्गीकरण करणाऱ्या व्याकरणिक घटकाच्या अभ्यासाला लिंगविचार म्हणतात.

उदा. -

तो मुलगा, ती मुलगी, ते मुल म्हणजेच मुलगा — पुल्लिंग, मुलगी — स्त्रीलिंग, मूल — नपुंसकलिंग.

वरील उदाहरणांवरून स्पष्ट होते की, मराठी भाषेत नामांचे लिंगानुसार वर्गीकरण केले जाते. या वर्गीकरणाचा, त्याच्या नियमांचा आणि वापराचा अभ्यास म्हणजे लिंगविचार होय.

◆ लिंगविचाराचे स्वरूप :

लिंग या संकल्पनेवरून लिंगविचाराचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) लिंगविचाराचा मुख्य संबंध नामाशी असतो.

२) मराठी व्याकरणात पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग असे तीन प्रमुख प्रकार आहेत.

३) सजीवांच्या बाबतीत नर-मादी अथवा स्त्री-पुरुष यांसारखे नैसर्गिक भेद लिंग ओळखण्यास मदत करतात.

४) निर्जीव वस्तू आणि अमूर्त संकल्पनांनाही भाषेच्या नियमानुसार लिंग असते. ते सर्वसाधारणपणे तो,ती,ते किंवा हा, ही,हे वापरून ओळखता येते.

उदा. - तो दगड - पुल्लिंग, तो नदी - स्त्रीलिंग, ते घर - नपुंसकलिंग.

५) लिंगानुसार विशेषण, सर्वनाम आणि क्रियापदाच्या काही रूपांत बदल होतो.

६) वाक्यातील शब्दांचा परस्परसंबंध स्पष्ट करताना लिंग महत्त्वाचे ठरते.

७) भाषेतील शब्दांचे लिंग ओळखण्यासाठी भाषेतील काही नियम आणि वापर लक्षात घ्यावा लागतो.

८) काही शब्दांचे लिंग त्यांच्या अर्थावरून समजते; परंतु याला बरेच अपवाद आहेत.

९) एकाच विशेषणाची / क्रियापदाची वेगवेगळी रूपे लिंगानुसार वापरली जातात.

१०) भाषेत योग्य लिंगाचा वापर केल्यामुळे वाक्य अधिक व्याकरणशुद्ध आणि स्पष्ट होते.

११) बोलीभाषेतील विविधता लिंगविचारात येते.

१२) व्याकरणाचा मूलभूत भाग म्हणून नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद लिंगविचाराचा संबंध येतो.

◆ लिंगविचाराचे महत्त्व :

भाषेतील इतर घटकाप्रमाणे लिंग विचार अधिक महत्वाचा आहे. यामूळे शुद्ध भाषा वापरण्यास मदत होते, आपली वाक्यरचना स्पष्ट होते, लेखनकौशल्य विकसित होऊन भाषिक विकास साध्य होतो, बोलण्यातील अचूकता येते, शब्दज्ञान वाढते, त्यातून व्याकरणाचे ज्ञान दृढ होते, अर्थातील स्पष्टता वाढून भाषा अधिक विश्वसनिय बनते, साहित्याचे योग्य आकलन होते, शब्दांच्या रूपामधील बदल आपल्याला लक्षात येतात,भाषेत एक शिस्तपणा निर्माण होऊन आपल्याला प्रभावी संवाद साधण्यास मदत होते.

◆ लिंगविचाराचे प्रकार

मराठी व्याकरणात लिंगाचे मुख्यतः तीन प्रकार मानले जातात.

१) . पुल्लिंग २) स्त्रीलिंग ३) नपुंसकलिंग

◆ पुल्लिंग :

ज्या नामावरून पुरुष किंवा नर जातीचा बोध होतो तेव्हा त्यास पुल्लिंग म्हणतात.

उदा. -

मुलगा, शिक्षक, राजा, सिंह, घोडा.

◆ स्त्रीलिंग :

ज्या नामावरून स्त्री किंवा मादी जातीचा बोध होतो तेव्हा त्यास स्त्रीलिंग म्हणतात.

उदा. -

मुलगी, गाय, राणी, घोडी,मुंगी.

◆ नपुंसकलिंग :

ज्या नामावरून पुरुष किंवा स्त्री यापैकी कोणत्याही जातीचा बोध होत नाही तेव्हा त्यास नपुंसकलिंग म्हणतात.

उदा. - मूल, वासरू, घोडे, कुत्रे, फुल.

◆ स्थूलमानाने लिंगव्यवस्थेचे काही नियम खालील प्रमाणे :

नियम : १.

आ-कारान्त पुल्लिंगी प्राणिवाचक नामाचे स्त्रीलिंगी रूप ई-कारान्त व नपुंसकलिंगी रूप हे ए-कारान्त होते.

उदा. -

पुल्लिंग - मुलगा, घोडा, बकरा.

स्त्रीलिंग - मुलगी, घोडी, बकरी.

नपुंसकलिंग - मुले, घोडे, बकरे.
नियम २.

काही प्राणीवाचक पुल्लिंगी शब्दांस ईण प्रत्यय लागून स्त्रीलिंगी रूपे तयार होतात.

उदा. -
पुल्लिंग - कुंभार, वाघ, माकड
स्त्रीलिंग - कुंभारीन, वाघीण, माकडीण.
नियम ३.

काही अ-कारान्त प्राणिवाचक पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी रूप हे इ-कारान्त होते.

उदा. -
पुल्लिंग - देव, नट, हरीण.
स्त्रीलिंग - देवी, नटी, हरिणी.
नियम - ४.

काही अ-कारान्त पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी रूप हे आ-कारान्त होते.

उदा. -
पुल्लिंग - चंद्र, शिक्षक, लेखक
स्त्रीलिंग - चंद्रिका, शिक्षिका, लेखिका.
नियम - ५.

काही आ-कारान्त पुल्लिंगी पदार्थवाचक शब्दांचे स्त्रीलिंगी रूप इ-कारान्त होते.

उदा. -
पुल्लिंग - फळा, गोळा, पोळा
स्त्रीलिंग - फळी, गोळी, गोळी.
नियम ६.

संस्कृत मधून मराठीत आलेल्या नामांची स्त्रीलिंगी रूपे ही इ - कारान्त होतात.

उदा. -

पुल्लिंग - राजा, विद्वान, कवी

स्त्रीलिंग - राणी, विदुषी, कवयित्री.

नियम - ७.

काही शब्दांची स्त्रीलिंग रूपे स्वतंत्र्य तयार होतात.

उदा. -

पुल्लिंग - बाप, पुरुष, पोपट

स्त्रीलिंग - आई, स्त्री, मैना.

नियम - ८.

मराठीतील काही शब्द वेगवेगळ्या लिंगामध्ये पाहावयास मिळतात. असे लिंग तो ती ते या अक्षराने ओळखता येतात त्याचबरोबर परभाषेतूनही काही शब्दांचे लिंग मराठी अर्थावरून ठरविले जातात तर सामासिक शब्दांचे लिंग हे त्यांच्या शेवटच्या शब्दाच्या लिंगावरून ठरवले जाते, तर काही शब्दांचे पुल्लिंगी व स्त्रीलिंगी शब्द हे केवळ स्तलिंगीच असे उच्चार केले जातात तर काही स्त्रीलिंगीची रूपे हे मराठीत पुल्लिंगी नाहीत असे अनेक शब्द लिंगविचारात पाहायला मिळतात.

सारांश :

लिंगविचार हा मराठी व्याकरणातील नामरचनेशी संबंधित असा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. नामाचे पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग असे वर्गीकरण करून त्यानुसार विशेषण, सर्वनाम आणि क्रियापदांचा योग्य वापर करण्यास लिंगविचार मदत करतो. लिंगविचाराच्या अभ्यासामुळे भाषेची शुद्धता, अचूकता, वाक्यरचना, लेखनकौशल्य, संभाषण आणि भाषिक आकलन विकसित होते.

म्हणूनच व्यवहारातील व साहित्यिक मराठी भाषा शिकताना आणि तिचा व्याकरणिक अभ्यास करताना लिंगविचाराचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे.

प्रकरण : तिसरे

—----------

◆ वाक्यविचार :

संकल्पना, व्याख्या, स्वरूप आणि वाक्याचे प्रकार

मराठी व्याकरणामध्ये संधी, लिंगविचार याप्रमाणेच वाक्यविचार हा घटक सुद्धा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शब्दांच्या साहाय्याने विचार, भावना, प्रश्न, आज्ञा, इच्छा आणि माहिती व्यक्त केली जाते. हे शब्द योग्य क्रमाने जेव्हा एकत्र येतात तेव्हा अर्थपूर्ण समूह तयार होतो. आणि त्यातूनच वाक्याची निर्मिती होते. वाक्यविचाराच्या अभ्यासात वाक्याची संकल्पना, व्याख्या, स्वरूप, अर्थानुसार प्रकार आणि रचनेनुसार प्रकार याची ओळख होते.

◆ वाक्य म्हणजे काय?

पूर्ण अर्थाच्या बोलण्याला वाक्य असे म्हणतात. वाक्यातील महत्वाचे घटक म्हणजे कर्ता, कर्म, आणि क्रियापद असतात.

एक विशिष्ट शब्दांचा असा समूह की, ज्यातून पूर्ण आणि स्पष्ट अर्थ व्यक्त होतो, त्यास वाक्य असे म्हणतात.

म्हणजेच वाक्य हे भाषेतील विचार व्यक्त करण्याचे मूलभूत साधन आहे. आपण बोलताना किंवा लिहिताना शब्दांचा उपयोग करून आपले विचार दुसऱ्यांपर्यंत पोहोचवतो. शब्दांची केवळ मांडणी म्हणजे वाक्य नव्हे; त्या शब्दसमूहातून अर्थपूर्ण विधान व्यक्त होणे आवश्यक असते. तेव्हाच वाक्य परिपूर्ण होते.

जसे -

१. शरद अभ्यास करतो.

२. राधाने अभ्यास केला का?

३. अबब ! केवढी प्रचंड गर्दी ही !

◆ वाक्याच्या व्याख्या :

१) पूर्ण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला वाक्य असे म्हणतात.

२) व्याकरणाच्या नियमांनुसार रचलेला आणि पूर्ण अर्थबोध करून देणारा शब्दसमूह म्हणजे वाक्य.

३) वक्त्याचा विचार, भावना, प्रश्न किंवा उद्देश पूर्णपणे व्यक्त करणाऱ्या भाषिक रचनेला वाक्य असे म्हणतात.

◆ वाक्याचे स्वरूप :

१. अर्थपूर्णत वाक्यातून पूर्ण आणि समजण्यास मदत होते.

२. वाक्याची निर्मिती ही शब्दांच्या साहाय्याने होते.

३. वाक्यातील शब्दांची मांडणी किंवा रचना ही भाषेच्या व्याकरणिक नियमांनुसार होते.

४. वाक्यातून कर्ता, कर्म, कियापद, विधेय याची ओळख होते.

५. वाक्यातील क्रियापदामुळे कृती, अवस्था किंवा घटना स्पष्ट होते.

६. वाक्य सामान्यतः स्वतंत्रपणे अर्थ व्यक्त करू शकते.

७. शब्दांचा योग्य क्रम, रचना वाक्याचा अर्थ स्पष्ट करण्यास मदत करतो.

८. वाक्याद्वारे आपले विचार, भावना आणि अनुभव व्यक्त केल्या जातात.

९. भाषिक लेखनात पूर्णविराम, प्रश्नचिन्ह आणि उद्गारचिन्ह यांचा वापर वाक्याच्या स्वरूपानुसार होतो.

१०. वाक्ये ही साधी, संयुक्त किंवा मिश्र अशा विविध रचनांची असू शकतात.

◆ वाक्यांचे प्रकार :

मुख्य प्रकार दोन - १. अर्थमूलक २. रचनामूलक

१) वाक्याच्या अर्थानुसार :

१. विधानार्थी वाक्य २. प्रश्नार्थी वाक्य ३. उद्‌गारार्थी वाक्य
४. होकारार्थी वाक्य ५. नकारार्थी वाक्य.

२) वाक्याच्या रचनेनुसार :

१. केवल वाक्य २. मिश्र वाक्य ३. संयुक्त वाक्य.

◆ अर्थानुसार वाक्याचे प्रकार :

१ विधानार्थी वाक्य :

ज्या वाक्यात एखादी घटना, कृती, वस्तुस्थिती किंवा माहिती यांविषयी केवळ विधान केलेले असते, त्यास विधानार्थी वाक्य म्हणतात. याला विधानवाचक, साधे वाक्य असेही म्हणतात.
विधानार्थी वाक्ये ही तिन्ही काळात येऊ शकतात.
जसे -

१. सूर्य पश्चिमेला मावळतो.
२. रोहन अभ्यास करत नाही.

२. प्रश्नार्थी वाक्य :

ज्या वाक्यात प्रश्न विचारला जातो, त्याला प्रश्नार्थी वाक्य म्हणतात.
जसे -

१. तुझे गाव कोणते आहे ?
२. तू काल कुठे गेला होतास ?
३. भारताची राजधानी कोणती ?

३. उद्‌गारार्थी वाक्य :

ज्या वाक्यात आनंद, दुःख, आश्चर्य, भीती, कौतुक, खेद किंवा इतर तीव्र भावना व्यक्त होतात, त्यास उद्‌गारार्थी वाक्य म्हणतात.

जसे -

१. वा! किती सुंदर अक्षर आहे!

२. शाब्बास! तू सुंदर चित्र काढलेस !

३. अहाहा! किती स्वादिष्ट चव आहे!

४. होकारार्थी वाक्य :

ज्या वाक्यात क्रियेचा होकार दर्शविलेला असतो तेव्हा त्यास होकारार्थी किंवा करणरूपी वाक्य म्हणतात.

जसे -

१. मुलांनो शांत बसा.

२. अंगद अभ्यास करतो.

३. त्यांनी चांगले वागावे.

५. नकारार्थी वाक्य :

ज्या वाक्यात एखादी कृती, घटना, वस्तुस्थिती किंवा विधान नाकारले जाते, किंवा क्रियेचा नकार दर्शविलेला असतो त्यास नकारार्थी किंवा अकरणरूपी वाक्य असे म्हणतात.

जसे -

१. मी आज गावाला जाणार नाही.

२. राधिका अभ्यास करत नाही.

३. कोणीही खोटे बोलू नये.

याशिवाय क्रियापदाच्या अर्थावरून वाक्याचे आज्ञार्थी वाक्य, स्वार्थी वाक्य, विध्यर्थी वाक्य व संकेतार्थी वाक्य असे वाक्यांचे चार प्रकार पडतात.

◆ (२). रचनेनुसार वाक्याचे प्रकार :

वाक्य रचनेनुसार वाक्यांचे मुख्यतः तीन प्रकार पडतात.

१. केवल वाक्य
२. मिश्र वाक्य
३. संयुक्त वाक्य.

१. केवल वाक्य :

ज्या वाक्यात एकच उद्देश (कर्ता) व एकच विधेय (क्रियापद) असते त्यास केवल वाक्य किंवा शुद्ध वाक्य म्हणतात.

जसे -

१. नंदिनी गाणे गाते.
२. मी दररोज सकाळी फिरायला जातो.
३. उद्यापासून शाळा सुरू होईल.

२. मिश्र वाक्य :

ज्या वाक्यात एक मुख्य उपवाक्य आणि त्यावर अवलंबून असलेले एक किंवा अधिक गौण उपवाक्ये असतात, त्यास मिश्र वाक्य असे म्हणतात.

जसे -

१. जो नियमित योगा करतो, तो सदैव प्रसन्न राहतो.
२. जो तळे रखील तो पाणी चाखेल.
३. जेव्हा पाऊस पडतो, तेव्हा वातावरण थंड होते.

३. संयुक्त वाक्य :

जेव्हा दोन किंवा अधिक स्वतंत्र अर्थपूर्ण उपवाक्ये ही उभयान्वयी अव्ययांच्या साहाय्याने जोडली जातात, तेव्हा त्यास संयुक्त वाक्य असे म्हणतात.

जसे -

१. विजय वाचन करतो आणि अजय गाणे गातो .
२. बाबाने त्याला बोलावले, पण तो आला नाही.
३. पाऊस उघडला होता, म्हणून आम्ही घरी आलो.

◆ वाक्यविचाराचे महत्त्व :

१. भाषेतील विचार स्पष्ट। अचूकपणे व्यक्त करता येतात.
२. योग्य शब्दक्रम समजतो आणि व्याकरणिक रचना समजते.
३. लेखनातील चुका त्रुटी कमी करण्यास मदत होते.
४. प्रश्न, आज्ञा, विनंती,विचार आणि भावना या योग्य प्रकारे व्यक्त करता येतात.
५. वाक्यांचे विश्लेषण करण्यास मदत होते.
६. संयुक्त वाक्य आणि मिश्र वाक्य यांची रचना समजते.
७. निबंधलेखन, भाषांतर, पत्रलेखन, संवाद लेखन आणि साहित्यलेखन यासाठी मदत होते.
८. वाचनातून शब्द, संकल्पना अर्थ समजून घेण्याची क्षमता वाढते.
९. भाषेच्या व्याकरणिक नियमांचे ज्ञान वृद्धिंगत होते.
१०. शालेय, महाविद्यालयीन आणि विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी उपयोग होतो.

◆ सारांश :

आपल्या व्यवहारात आपले विचार आणि भावना व्यक्त करण्याचे मूलभूत साधन म्हणजे भाषा आहे. बोलत असताना पूर्ण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला वाक्य म्हणतात. वाक्याचा अचूक अभ्यास केल्यामुळे मराठी भाषेतील वाक्यरचना समजते, आपल्याला भाषेचा योग्य वापर करता येतो आणि लेखन, वाचन, भाषण व संभाषण अधिक प्रभावीपणे करण्यास मदत होते.

प्रकरण : चौथे

—----------

◆ वचनविचार :

संकल्पना, स्वरूप, महत्त्व आणि वचनाचे प्रकार.

संधीविचार, लिंगविचार, वाक्यविचार याप्रमाणेच मराठी व्याकरणामध्ये वचनविचार हा नामविचारातील एक महत्त्वाचा घटक आहे. व्यक्ती, प्राणी, वस्तू किंवा पदार्थ यांची संख्या एक आहे की एकापेक्षा अधिक आहे, हे वचनावरून आपल्याला समजते. नामाच्या रुपावरून जसे त्याचे लिंग समजते त्याप्रमाणे त्या नामाने दर्शविलेली वस्तू एक आहे, की अनेक आहेत हेही समजते.

नामाच्या ठिकाणी संख्या सुचविण्याचा जो धर्म असतो त्यास वचन म्हणतात. संस्कृत भाषेत वचनाचे एकवचन, द्विवचन व बहुवचन अशी तीन वचने आहेत.

◆ वचनविचार म्हणजे काय ?

१. नामाच्या संख्येचा बोध करून देणाऱ्या व्याकरणिक घटकाच्या अभ्यासाला वचनविचार म्हणतात.

२. भाषेत एक किंवा एकापेक्षा अधिक व्यक्ती, वस्तू अथवा घटक व्यक्त करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्याकरणिक अभ्यासाला

वचनविचार असे म्हणतात.

एकूणच एखादी वस्तू एक आहे, की अनेक आहेत, हे सांगणाऱ्या शब्दरूपांला वचनविचार असे म्हणतात.

◆ वचनाचे प्रकार :

मराठी व्याकरणात वचनाचे मुख्यतः दोन प्रकार आहेत.

१. एकवचन २. अनेकवचन.

◆ एकववचन :

ज्या शब्दातून एक व्यक्ती, प्राणी, वस्तू किंवा घटक यांचा बोध होतो, तेव्हा त्यास एकवचन म्हणतात.

जसे -

मुलगा, पुस्तक, झाड, गाय, घर.

◆ अनेकवचन :

ज्या शब्दातून एकापेक्षा अधिक व्यक्ती, प्राणी, वस्तू किंवा घटक यांचा बोध होतो, तेव्हा त्यास अनेकवचन म्हणतात.

जसे -

मुलगे, पुस्तके, झाडे, गायी, घरे.

◆ वचनबदलामुळे नामाच्या रूपात होणारा बदल पुढील काही नियमातून लक्षात येतो.

◆ पुल्लिंगी नामाचे अनेकवचन :

नियम - १.

आ-कारान्त पुल्लिंगी नामाचे अनेकवचन ए-कारान्त होते.

जसे -

एककचन - आंबा, घोडा, काटा, मासा, रस्ता.

अनेकवचन - आंबे, घोडे, काटे, मासे, रस्ते.
नियम - २.
आ-कारान्ताशिवाय इतर सर्व पुल्लिंगी नामांची रूपे ही दोन्ही वचनात सारखीच असतात.
जसे -
एककचन - लाडू, गहू, माळी, कागद, मणी.
अनेकवचन - लाडू, गहू, माळी, कागद, मणी.

◆ स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन :
नियम १.
अ-कारान्त स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन हे कधी आ-कारान्त तर कधी ई-कारान्त होते.
जसे -
एकवचन - सून, भिंत, वाट, गाठ, गंमत.
अनेकवचन - सुना, भिंती, वाटा, गाठी, गंमती.
नियम २.
आ-कारान्त स्त्रीलिंगी तत्सम नामाचे एकवचन व अनेकवचन हे सारखेच असते.
जसे -
एकवचन - कथा, माता, भाषा, शाळा,सभा.
अनेकवचन - कथा, माता, भाषा, शाळा,सभा.
नियम ३.
ई-कारान्त स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन हे या-कारान्त होते.
जसे -
एकवचन - भाजी, पोळी, बाई, गाडी, नदी.
अनेकवचन - भाज्या, पोळ्या, बाया, गाड्या, नदया.

◆ नपुंसकलिंगी नामांचे अनेकवचन :

नियम १.

अ-कारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन हे ए-कारान्त होते.

जसे -

एकवचन - मूल, पुस्तक, माणूस, फूल, घर.

अनेकवचन - मुले, पुस्तके, माणसे, फुले, घरे.

नियम २.

ऊ-कारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन हे ए-कारान्त होते.

जसे -

एकवचन - लिंबू, पिलू, लेकरू, पाखरू, वासरू.

अनेकवचन - लिंबे, पिले, लेकरे, पाखरे, वासरे.

नियम ३.

ए-कारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन हे ई-कारान्त होते.

जसे -

एकवचन - कुत्रे, गाणे, खेडे, नाणे, वांगे.

अनेकवचन - कुत्री, गाणी, खेडी,नाणी, वांगी.

अशाप्रकारे पुल्लिंग स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंगी नामांचे अनेकवचन होताना वरील नियमानुसार लक्षात येते. याला काही प्रमाणात अपवाद ही आहेत.

◆ वचनविचाराचे महत्त्व :

वचनविचाराचे भाषिक व्यवहारात व व्याकरणात अधिक महत्त्व आहे जसे की, लेखनातील शुद्धलेखनासाठी उपयुक्त, आपली वाक्यरचना सुधारन्यासाठी उपयोग आहे.वचनविचारामुळे वाक्यातील अर्थ स्पष्ट होतो. व्याकरणाचे ज्ञान वाढन्यास मदत होते. आपले लेखन, वाचन व संभाषण कौशल्य विकसित होते. आपल्या बोलण्यात स्पष्टता येऊन बोलण्यातील अचूकता वाढते. आपल्या शब्द संग्रहात

वृद्धी होण्यास मदत होते. साहित्याचे आकलन होऊन भाषा संप्रेषणात वाढ होते.

सारांश :

व्याकरणातील इतर घटकाप्रमाणे वचनविचाराच्या अभ्यासामुळे शुद्धलेखन, वाक्यरचना, शब्दज्ञान, शब्दवाढ आणि भाषिक अभिव्यक्तीचा विकास होतो. म्हणून आपल्या भाषिक व्यवहारात मराठी भाषेचा योग्य वापर करण्यासाठी वचनविचाराचे ज्ञान आवश्यक आहे.

प्रकरण : पाचवे :

—----------

◆ अलंकार :

संकल्पना, व्याख्या, स्वरूप, महत्त्व आणि प्रकार :

व्यवहारांमध्ये आपण अलंकार हा शब्द दागिना या अर्थाने वापरतो.

'अलंकार' या शब्दाचा सामान्य अर्थ दागिना किंवा शोभा वाढविणारी वस्तू असा होतो. ज्याप्रमाणे दागिन्यांमुळे शरीराचे सौंदर्य खुलून दिसते. त्याप्रमाणे भाषेचे सौंदर्य हे ही अलंकारांमुळे सुशोभित होते. यामुळे कविता किंवा साहित्यकृतीचे सौंदर्य वाढते. जसे की दाराच्या समोरून हत्ती गेला दारावरून हत्ती गेला असे आपण म्हणतो या अलंकारिक चमत्कृतीमुळेच भाषेला शोभा येते. भाषेतील ध्वनी वर्ण शब्द यातून भाषेला सौंदर्य प्राप्त होते. म्हणून व्याकरणामध्ये अलंकार महत्वपूर्ण घटक आहे.

◆ अलंकार व्याख्या :

१. ज्या गुणधर्मामुळे भाषेला शोभा येते तिचे सौंदर्य वाढते आणि भाषेतून व्यक्त होणारा आशय हा अधिक प्रभावी होतो तेव्हा त्यास अलंकार म्हणतात.

२. भाषेतील शब्द किंवा अर्थ यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे काव्यात निर्माण होणाऱ्या सौंदर्याला अलंकार म्हणतात.

◆ अलंकाराचे स्वरूप :

अलंकार हा काव्यसौंदर्याचा घटक असतो. अलंकारामुळे भाषेची कलात्मकता वाढते. अलंकार शब्दांच्या ध्वनी, पुनरावृत्ती किंवा रचनेवर आधारित असतात. कवीच्या कल्पनाशक्तीमुळे अलंकारांची निर्मिती होते. अलंकारातून भावनांची प्रभावी अभिव्यक्ती होते. अलंकारातून भाषेला नादमाधुर्य प्राप्त होते. साहित्य निर्मितीमध्ये अलंकाराचे रसयुक्त सौंदर्यात्मक महत्त्व वाढते.

◆ अलंकाराचे महत्त्व :

१. भाषेचे, काव्याचे सौंदर्य वाढविण्यासाठी अलंकाराचे महत्व आहे

२. भाषेतील आशय स्पष्ट करता येतो.

३. मनातील भावनांना प्रभावी रूप देण्यासाठी अलंकार महत्वाचा आहे.

४. अलंकारामुळे कल्पनाशक्तीला चालना मिळते.

५. भाषा आणि काव्यात नादमाधुर्य निर्माण करणे.

६. अलंकारामुळे आकर्षक भाषाशैलीमुळे वाचकांचे लक्ष वेधून घेता येते.

७.अलंकारातून निसर्ग, व्यक्ती आणि प्रसंग यांचे वर्णन अधिक चित्रमय

करून त्यात जीवंतपणा निर्माण करता येतो.
८. साहित्याचा आस्वाद वाढविन्यास अलंकार महत्वपूर्ण ठरतो.
९. साहित्यिक शैली समजण्यासाठी अलंकार महत्त्वाचा आहे.
१०. वाचन,लेखन,संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी अलंकार महत्वपूर्ण ठरतो.

◆ अलंकाराचे प्रमुख प्रकार :
अलंकाराचे मुख्य दोन प्रकार पडतात :
१. शब्दालंकार २. अर्थालंकार

१. शब्दालंकार :
१.जेव्हा शब्दातील अक्षर रचनेमुळे नाद निर्माण सौंदर्य प्राप्त होते तेव्हा त्यास शब्दालंकार असे म्हणतात.
२.ज्या अलंकारात शब्दांच्या विशिष्ट रचनेमुळे, ध्वनींच्या पुनरावृत्तीमुळे सौंदर्य निर्माण होते, त्यास शब्दालंकार म्हणतात.

◆ शब्दालंकाराचे मुख्य तीन प्रकार पडतात ते म्हणजे -
१. अनुप्रास अलंकार, २.यमक अलंकार, ३. श्लेष अलंकार.

१. अनुप्रास अलंकार :
एखाद्या वाक्यात किंवा काव्याच्या चरणात अक्षराच्या पुनरावृत्तीमुळे सुंदर लय किंवा नाद निर्माण होऊन काव्याला एक प्रकारचे सौंदर्य प्राप्त होते तेव्हा अनुप्रास अलंकार होतो.
जसे -
१. आपण आलात आम्ही आपले आभारी आहोत.
२. चंद्राचे चंचल चांदणे चमचम चमकते.

३. आजीने आईला आतल्या आलमारीतील आवळे आणून दिले.

२. यमक अलंकार :

कवितेतील चरणांच्या किंवा ओळींच्या शेवटी अथवा ठरावीक ठिकाणी समान ध्वनी असलेले शब्द आल्यामुळे यमक अलंकार निर्माण होतो.

जसे -

१. सदा सर्वदा योग तुझा घडावा
तुझे कारणे देह माझा पडावा

२. सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो ।
कलंकमतीचा झडो, विषय सर्वथा नावडो ।

३. सुर समस्त इच्छा दृढनिश्चये,
सुरस मस्त असे वदले स्वये.

कवितेच्या सुरुवातीला, मध्यभागी आणि शेवटी येणाऱ्या अक्षराच्या सारखेपणा नुसार यमक अलंकाराचे आद्ययमक, मध्ययमक, अंत्ययमक, दामयमक, पुष्पयमक असे उपप्रकार पडतात.

३. श्लेष अलंकार :

एकाच शब्दातून अथवा शब्दरचनेतून एकापेक्षा अधिक अर्थ सूचित होतात आणि त्या अर्थांमुळे काव्यात चमत्कृती निर्माण होऊन श्लेष अलंकार होतो.

जसे -

१. शंकराला पुजावे सुमनाने (सुमनाने - १ चांगल्या मनाने २ फुलाने)

२. हे मेघा तू सर्वांना जीवन देतोस (जीवन - १ आयुष्य २ पाणी)

३.बैल मेला पुरावा काय? (पुरावा - १ प्रमाण २ मातीत गाढणे)

शब्दाची फोड केल्यानंतर शब्दाची फोड न करता जे दोन अर्थ कळतात त्यावरून सभंग श्लेष अलंकार व अभंग श्लेष अलंकार असे दोन प्रकार पडतात.

२. अर्थालंकार :

ज्या अलंकारात शब्दांच्या अर्थामुळे, तुलना किंवा अर्थवैशिष्ट्यामुळे काव्यसौंदर्य निर्माण होते, तेव्हा त्यास अर्थालंकार म्हणतात.

अर्थालंकाराचे मुख्य वीस प्रकार पडतात. हे प्रकार पाहण्यापूर्वी अर्थालंकारातील काही महत्वपूर्ण संकल्पना समजून घ्याव्या लागतात.

जसे -

◆ उपमेय - ज्याची तुलना करावयाची आहे ते.

तिचे दात मोत्याप्रमाणे आहेत. (उपमेय - तिचे दात)

◆ उपमान - ज्याच्याशी तुलना करावयाची आहे ते.

तिचे दात मोत्याप्रमाणे आहेत. (उपमान - मोती)

◆ साम्यवाचक शब्द - सारखेपणा दाखविणारा शब्द.

तिचे दात मोत्याप्रमाणे आहेत. (साम्यवाचक शब्द - प्रमाणे)

◆ साधारण धर्म - दोन वस्तूत असलेला सारखेपणा.

◆ अर्थालंकाराचे प्रकार :

१. उपमा ६. अनन्वय ११. विरोधाभास १६. व्याजस्तुती

२. उत्प्रेक्षा ७. भ्रांन्तिमान १२. असंगती १७. व्याजोक्ती

३. अपन्हुती ८. ससंदेह१५. १३. सार १९. स्वभावोक्ती

४. रूपक ९. दृष्टांत १४. अन्योक्ती १९. अतिशयोक्ती

५. व्यतिरेक १०. अर्थान्तरन्यास १५. पर्यायोक्त २०. चेतनगुणोक्ती.

१. उपमा अलंकार :

जेव्हा दोन वस्तूतील साम्य किंवा सारखेपणा वर्णिलेला असतो तेव्हा उपमा अलंकार होतो. (उपमा अलंकारात समान, सारखा, सम, परी, प्रमाणे, गत, सदृश, जसा यासारखे साम्यवाचक शब्द येतात.)

जसे -

१. सीतेचे मुख चंद्रासारखे सुंदर आहे.

२. तिचे दात मोत्याप्रमाणे आहेत.

३.मेघासम तो शाम सावळा.

२. उत्प्रेक्षा अलंकार :

उपमेय हे जणू उपमानच आहे असे वर्णन जेथे आलेले असते तेथे उत्प्रेक्षा अलंकार होतो. (या अलंवकारात जणू, जणूकाय, गमे, वाटे, भासे, की, जेवि यासारखे साम्यवाचक शब्द येतात.)

जसे -

१. परवाचा भूकंप म्हणजे जणू सृष्टीचे तांडवच.

२.तिचे गाल म्हणजे जणू कापुसच तो.

३. ती काळोखी रात्र म्हणजे मृत्यूचेच भय जणू.

३.दृष्टांत अलंकार :

व्यवहारातील एखादा विचार किंवा एखादी गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाची एखादी गोष्ट किंवा उदाहरण दिले/सांगितले जाते तेव्हा त्यास दृष्टांत अलंकार म्हणतात.

जसे -

१. लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।

२. चंद्र तेथे चंद्रिका । शंभू तेथे अंबिका ।
संत तेथे विवेका । असणे की जे ।

३. महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे नाचती ।
तुका म्हणे हेचि फळ । पाय धरल्या न चले बळ ।

४. अपन्हुती अलंकार :

उपमेयाचा निषेध करून ते उपमानच आहे असे जेथे सांगितले जाते तेथे अपन्हुती अलंकार होतो.
जसे - शिवाजी कसला? सिंहच तो.

५. रूपक अलंकार :

उपमेय व उपमान हे एकरूप आहेत ते भिन्न नाहीत असे वर्णन जेथे आलेले असते तेथे रूपक अलंकार होतो.
जसे - लहान मूल म्हणजे मातीचा गोळा,
आकार द्यावा तशी मूर्ती घडते.

६. व्यतिरेक अलंकार :

उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन जेथे आलेले असते, तेथे व्यतिरेक अलंकार होतो.
जसे - तुझे मूख चंद्रापेक्षाही सुंदर आहे.

७. अनन्वय अलंकार :

जेव्हा उपमेयाची तुलना कोणाशीही करता येत नाही म्हणजे उपमेयाची तुलना उपमेयाशीच करावी लागते तेव्हा अनन्वय अलंकार होतो.
जसे - आईसारखी मायाळू आईच.

८. भ्रान्तिमान अलंकार :

उपमानाच्या जागी उपमेयच आहे असा भ्रम निर्माण होऊन तशी काही कृती केली जाते तेव्हा भ्रान्तिमान अलंकार होतो.
जसे - शुभ्र चांदणे थाळीत पडते, दूध समजूनी मनी चाटते.

९. ससंदेह अलंकार :

उपमेय कोणते व उपमान कोणते याबद्दल आपल्या मनात शंका निर्माण होते तेव्हा ससंदेह अलंकार होतो.
जसे - हा आंबा आहे की साखर?

१०. अर्थान्तरन्यास अलंकार :

विशिष्ट उदाहरणावरून एखादा सामान्य सिद्धांत मांडला जातो तेव्हा अर्थान्तरन्यास अलंकार होतो.
जसे - एका हाते कधि तरि मुळी वाजते काय टाळी?

११. विरोधाभास अलंकार :

एखाद्या विधानात वर वर दिसायला विरोध आहे असे वाटते; परंतु प्रत्यक्षात तो विरोध नसतो म्हणजेच विरोधाचा आभास होतो, तेव्हा तेथे विरोधाभास अलंकार होतो.
जसे - स्वतःसाठी जगलास तर मेलास,
दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास.

१२. असंगती अलंकार :

कारण एका ठिकाणी आणि त्याचे कार्य दुसऱ्याच ठिकाणी असे वर्णन जेथे आलेले असते तेथे असंगती अलंकार होतो.
जसे - बाळ तान्हुलं पडलं जमिनीवरी । जखम झाली त्याची मातेच्या काळजावरी ।

१३. सार अलंकार :

एखाद्या वाक्यातील कल्पना चढत्या क्रमाने मांडून उत्कर्ष साधला जातो किंवा उतरत्या क्रमाने मांडून उत्कर्ष साधला जातो तेव्हा सार अलंकार होतो.

जसे - विद्येविना मति गेली । मतिविना नीती गेली ।
नीतिविना गती गेली । ग तिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

१४. अन्योक्ती अलंकार :

प्रत्यक्ष व्यक्तीला बोलता येत नाही म्हणून त्याच्याबद्दल जे बोलायचे आहे ते दुसऱ्यावर घालून बोलणे व आपल्या मनातील इच्छा पूर्ण करणे असे वर्णन जेथे आलेले असते तेथे अन्योक्ती अलंकार होतो.

जसे - बका ऐशा ढोंगे तव अमती मासेचि फसती ।
परी ज्ञाते तुझे कपट लवलाही उमजती ।

१५. पर्यायोक्त अलंकार :

एखादी गोष्ट सरळ शब्दात न सांगता ती आडवळणाने सांगितली जाते तेव्हा पर्यायोक्त अलंकार होतो.

जसे - त्या सर्वांचा पोलीसांनी चांगलाच <u>पाहुणचार</u> केला. (मार दिला)

१६. व्याजस्तुती अलंकार :

वरवर स्तुती पण आतून निंदा किंवा वरवर निंदा पण आतून स्तुती असे वर्णन जेथे आलेले असते तेथे व्याजस्तुती अलंकार होतो.

जसे - केवढा उदार रे तू !

१७. व्याजोक्ती अलंकार :

एखाद्या गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देणे म्हणजेच सरळसरळ खोटे बोलणे असे वर्णन जेथे आलेले असते तेथे व्याजोक्ती अलंकार होतो.
जसे - आठवण त्याची होता नेत्र पाणावती ।
सांगे परी मी कांदा कापत होती ।

१८. अतिशयोक्ती अलंकार :

एखादी गोष्ट किंवा कल्पना आहे त्यापेक्षा अधिक फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता स्पष्ट करून सांगितलेली असते तेव्हा अतिशयोक्ती अलंकार होतो.
जसे - अरे ! तुला शोधायला सारा गाव पालथा घातला.

१९. स्वभावोक्ती अलंकार :

एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे किंवा प्रसंगाचे त्यांच्या स्वाभाविक स्थितीचे यथार्थ पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन जेथे केलेले असते तेथे स्वभावोक्ती अलंकार होतो.
जसे - घराघरातील चूल पेटली, चहा उकळुनी काळा झाला जरा चढविता दुसरे भांडे, भातही शिजुनी होईल पिवळा.

२०. चेतनगुणोक्ती अलंकार :

निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागतात असे वर्णन जेथे आलेले असते तेथे चेतनगुणोक्ती अलंकार होतो.
जसे - चाफा बोलेना, चाफा चालेना ।
चाफा खंत करी, काही केल्या फुलेना ।

सारांश :

एकूणच अलंकारांचा अभ्यास केल्यामुळे कवितेतील सौंदर्य समजते, साहित्य वाचनीय होते,साहित्याचे रसग्रहण करता येते आणि स्वतःच्या लेखनात प्रभावी भाषेचा वापर करता येतो. म्हणून मराठी साहित्याच्या अभ्यासात अलंकारांना विशेष असे महत्त्व आहे असे म्हणता येईल.

(सविस्तर अभ्यास करण्यासाठी पुढील संदर्भ ग्रंथ वाचावीत.)

संदर्भ ग्रंथ :

१. सुगम मराठी व्याकरण - मो.रा. वाळिंबे
२. मराठीचे व्याकरण - लीला गोविलकर
३. अभिनव मराठी व्याकरण - प्र.न. जोशी
४. अलंकारविचार - रा. श्री. जोग
५. अलंकारमीमांसा - अ. ना. देशपांडे
६. अर्वाचीन मराठी व्याकरण - म. पां. सबनीस
७. मराठी व्याकरण परिचय - गंगाधर पाटील
८. मराठी व्याकरण परिचय - राजेश्वर हिरमेठ
९. मराठीचे मूळ व्याकरण - वसंत उत्पात
१०. स्पर्धा परीक्षांसाठी मराठी व्याकरण - बाळासाहेब शिंदे.

◆◆◆